चौपदरीकरण कराच...

सांगली ते कोल्हापूर मार्गावर धावणाऱ्या वाहनातून प्रवास करणाऱ्यांचा प्रवास करणाऱ्यांचा प्रवास जीवघेणा बनलाय. या मार्गाशेजारी असलेल्या गावांमध्ये, शहरामध्ये रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना आपण जीवंत राहू याची शाश्वती उरलेली नाही. नि एकूणच हा पन्नास – पंचावन्न किलोमीटरचा राज्यमार्ग जनतेसाठी मृत्यूचा सापळा बनलेला आहे. यासर्व पार्श्वभूमींचा विचार केल्यास से दिसते की, शासकीय व निम शासकीय कार्यालयाकडून दिरंगाई केली जात आहे. प्रत्येक वेळी टाळाटाळ करून वेळ मारून नेली जात आहे. शासनाच्या निष्क्रियतेमुळे या प्रश्नांचे घोंगडे अनेक वर्षे भिजत पडलेले आहे.

सांगली – कोल्हापूर रस्ता चौपदीकरण करण्यासाठीच्या आंदोलनात आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही उडी घेतलेली आहे. या मार्गाने आजवर हजारो लोकांचा बळी घेतलेला आहे. तरीही शासनाला अद्याप जाग आलेली नाही. सरकार अजून किती वळी घेणार आहे असा संतप्त सवाल नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दि. २६ रोजी स्वाभिमानीने सांगली कोल्हापूर रस्ता चक्का जाम करून आंदोलन केले. स्वाभिमानीसह अनेक पक्षाने तसेच शिवसनेनेही यावर तीव्र आंदोलन छेडलेले आहे. सुरूवातीला सांगली कोल्हापूर रस्ता जयसिंगपूर शहरातून काढून शहराचे दोन भाग करण्याचा शासनाचा डाव होता. त्याला विरोध होताच शहरातून व बाहेरून असे दोन रस्ते करण्याचा निर्णय घेण्यात आला. सांगली – कोल्हापूर रस्ता चौपदरीकरण व्हावा अशी दहा वर्षापासून मागणी सुरू आहे. तरीही शासनाला अद्याप जाग येईनासे झाले आहे. निविदा निघतात नि मागेही घेतल्या जातात. सरकारचा यामागे वेळकाढूपणा असल्याचे स्पष्ट होते. सांगली – कोल्हापूर रस्ता त्वरीत चौपदरीकरण होण्यासाठी सरकारने कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत. तसेत हा रस्ता करताना शासन बीओटीतून करणार आहे. शासनाने निधी उपलब्ध करून सांगली – कोल्हापूर रस्त्यांचे चौपदीकरण झाल्यास जनतेला दिलासा मिळणार आहे. ह्या रस्त्यावरून एका तासाला २००० वाहने येजा करतात. वास्तविक राज्यातील सर्वात जास्त रहदारीचा रस्ता म्हणून याची ओळख आहे. मात्र या रस्त्याची सध्या खड्ड्याचा नि अपघाताचा रस्ता म्हणून ओळख बनलेली आहे. येत्या काही दिवसात तरी या रस्ता करावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

♦ वर्ष ६ ♦ अंक १७ ♦१ ऑगस्ट २०११ ♦ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
♦ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ♦ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार ♦ **निवासी संपादक :** सदाभाऊ खोत ♦**मानद सल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ♦ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ♦ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी रु. १००/-

युरियाच्या किंमतीवरील नियंत्रण हटविणार?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): युरियाच्या किमती नियंत्रणमुक्त धोरणावर विचार करण्यासाठी केंद्रीय वित्तमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्र्यांची समिती येत्या काही दिवसात विचार करणार आहे.

गेल्या वित्तीय वर्षाच्या प्रारंभी सरकारने फॉस्फेट व पोटॅशसह आधारित खतांच्या किमतीवरील नियत्रंण अंशतः हटविले होते. आता रासायनिक खतांपैकी फक्त युरियाच्या किमतीवरच सरकारी नियत्रंण आहे. सध्या या खतांचे ठोक मूल्य ५३१० रूपये प्रतिटन आहे. खत मंत्रालयाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, मंत्री समुहाच्या या आठवड्यात होणाऱ्या बैठकीत युरियासुध्दा नियत्रंणमुक्त करण्याच्या मुद्यावर गंभीरपणे विचार केला जाईल, यासंदर्भात एक टिपण तयार करण्यत आले आहे. योजना आयोगाचे सदस्य सॉमित्र चौधरी अध्यक्षतेखालील सचिवांच्या उपसमितीने तयार केलेल्या मसुद्यातच युरिया अंशतः नियंत्रणमुक्त करण्यासाठी, तसेच अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर वर्षभराने किमती १० टक्क्याने वाढण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

त्यांनी स्वत:साठी खास तशी सोय करून घेतलीय! इतरांपेक्षा आपण अधिक उच्चपदस्थ आहोत, असा त्यांचा दावा आहे.

TEXMO INDUSTRIES
Taro
SKF Ball Bearings
54 वर्षांची विश्वासाची परंपरा
BCH स्टार्टर
The Z Series
ENERGY IS LIFE
C+ NSERVE IT
POWER SAVINGS GUIDE
• अधिकृत विक्रेते •
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, टवी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२१७७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३९३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/२४३४१०८
मोबा. : • विपुल - ९३२६९५३०२७ • बाबासाहेब : ९३२५७६१२२९

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266
Shree Datta Prestressess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

'कृष्णा साखर' च्या कमी दराचा निषेध

'स्वाभिमानी'ची मोटारसायकल रॅलीः वाळवा, कऱ्हाड तालुक्यांत आंदोलन

वाळवाः यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याने २००९ – १० चे अंतिम बिल २७७ रूपयांनी कमी काढल्याच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेने मोटारसायकल रॅली काढून निषेध केला. वाळवा व कऱ्हाड तालुक्याच्या वतीने अध्यक्ष अविनाश मोहिते यांना निवेदन देण्यात आले.

कमी दराच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली रॅली काढली. येडेमिच्छिंद्र येथील क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीस सुरूवात केली. शिरटे, नरसिंहपूर, किल्लेमच्छिंद्रगड फाटमार्ग दुपारी एक वाजता कृष्णा सहकारी साखर कारखाना मेन गेट समोर रॅली आली. गेटचे दरवाजे बंद असल्यामुळे आंदोलकांनी घोषणा गेत परिसर दणाणून सोडला, तोच कारखान्याचे अध्यक्ष मोहिते काही संचालकांसह गेटच्या बाहेर आले.

संघटनेचे नेते सदाभाऊ खोत म्हणाले, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे ६० लाख टन साखर पडून आहे. निर्यात बंदी उठविल्यास साखर निर्यात करून चांगला भाव देणे शक्य आहे. आत्ताची पिढी कारखानदारी मोडायला निघालेली आहे. २००९– १० चे अंतिम बिल २७५० रूपये, तर २०१०–११ तचा दुसरा हप्ता २०० रूपयांनी मिळालया पाहिजे. जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील म्हणाले, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरलेली आहे. सभासद हा कारखान्याचा मालक आहे. मालकालाच गेटवर अडवणूक केल्याबद्दल हा दिवस काळा दिवस म्हणावा लागेल. कऱ्हाड तालुकाध्यक्ष राजू मोहिते म्हणाले, राज्यातील २५हून अधिक साखर कारखान्यांनी २७५० हून अधिक दर दिलेला आहे. कृष्णा कारखान्यानेही चांगला दर देण्याची परंपरा जोपासावी. आम्हाला राजकारण नकोय. केवळ ऊस दर जादा द्यावा.

या वेळी घोषणाही देण्यात आल्या. प्रवेशाव्दारावर उपस्थित अविनाश मोहिते यांनी स्वागत केले. त्यांना यावेळी मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी मोहिते म्हणाले, अंतिम बिलाबाबत संचालक मंडळाबरोबर चर्चा करू. साखरेचे दर बाजारपेठेत वाढत असल्यामुळे दुसरा हप्ताही लवकरच देऊ.

कऱ्हाडमार्गे रॅली सह्याद्री कारखान्यावर आली. रेठरे बुद्रुक, खुबी, शेरे, कार्वे, कऱ्हाडमार्गे रॅली सह्याद्री कारखान्यावर आली. संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अप्पासाहेब पाटील, वाळवा तालुकाध्यक्ष दिनकरराव पाटील, कडेगाव तालुकाध्यक्ष महेंद्र देशमुख, शहाजी पाटील, अनिल करळे, मोहन गायकवाड, उत्तम पाटील आदींसह कार्यकर्ते रॅलीत सहभागी होते.

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ साऱ्यापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग		स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

साखरेच्या दरात वाढ

निर्यातीचा परिणाम : प्रतिक्विंटल १५० ते १६० रुपयांची वाढ

कोल्हापूर, ता. १ : गेल्या दोन-तीनमहिन्यांपासून घसरलेल्या साखरेच्या दराने अचानक उसळी घेतली. काल-परवाच्या तुलनेत साखरेच्या दरात प्रतिक्विंटल १५० ते १६० रुपयांची वाढ झाली. गेल्याच आठवड्यात केंद्र सरकारने आणखी पाच लाख टन साखर निर्यातीचा निर्णय घेतल्याचा परिणाम म्हणून देशांतर्गत साखरेच्या दरात वाढ झाली आहे. या दरवाढीने साखर कारखान्यांना चांगला दिलासा मिळाला आहे.

नुकत्याच संपलेल्या साखर हंगामाच्या सुरवातीलाच आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेचे दर जास्त होते. देशांतर्गतही साखरेला चांगला दर होता. तथापि, निर्यात साखरेचा निर्णय तातडीने घेण्याच्या उद्योगाच्यामागणीकडे दुर्लक्ष केल्याने देशा-तील साखरेचे भाव गडगडले. त्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारातमात्र साखरेला प्रतिक्विंटल ३२०० ते ३३०० रुपये दर होता. या बाजारात एप्रिलमध्ये ब्राझीलची साखर आली आणि दर कमी झाले; पण त्याचा फ टका देशांतर्गत साखरेच्या दरावर झाला.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात देशातील साखरेचे प्रतिक्विंटल दर २७०० ते २७५० रुपये होते. शेवटच्या आठवड्यातमात्र दर कमी झाले.मेमहिन्यात हे दर वाढतील, अशी अपेक्षा होती; पण यामहिन्यात तर प्रतिक्विंटल साखरेचा दर २३०० ते २३५० रुपयापर्यंत खाली आल्याने कारखानदारांच्या तोंडचे पाणीच पळाले. एकमहिना हे दर स्थिर होते. जूनच्या पहिल्या आठवड्यापासून दर वाढण्यास सुरवात झाली; पण हा दरही प्रतिक्विंटल २५०० रुपयांपेक्षा वर गेला नाही. गेल्या दोन-तीन दिवसांपासूनमात्र दरात किरकोळ स्वरूपाची वाढ होत होती. आज साखरेच्या दरात प्रतिक्विंटल १५० त १६० रुपयांची वाढ झाली.

डिसेंबरमहिन्यात घेतलेल्या साखर निर्यातीची अंमलबजावणी एप्रिलमध्ये झाली. आता गेल्या आठवड्यात केंद्राने पुन्हा ५ लाख टन साखर निर्यातीला परवानगी दिली. त्याचा परिणाम म्हणूनच साखरेच्या देशांतर्गत दरात वाढ झाल्याचे बोलले जाते. हा दर किमान २६०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत जाईल, असा साखर उद्योगातील जाणकारांचा अंदाज आहे.



जयसिंगपूर : खासदार फंडातील कामांच्या हमीपत्रावरून स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या मांरला.

हमीपत्रावरून जयसिंगपूर पालिकेत वाद विकोपाला

सत्तारूढ–'स्वाभिमानी'त जुंपली; कार्यकर्त्यांचा ठिय्या

जयसिंगपूर : खासदार फंडातील कामांच्या हमीपत्रावरून आज पुन्हा येथील नगरपालिकेतील सत्तारूढ गट आणि स्वाभिमानी कार्यकर्त्यांमध्ये जुंपली. मंगळवारी कौन्सिलचा ठराव करून हमीपत्र देण्याची भूमिका सत्तारूढ गटाने घेतली. ठरावाशिवाय हमीपत्र देण्याच्या मागणीवर ठाम राहून कार्यकर्त्यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या मारला.

मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या हमीपत्रावरूनही कार्यकर्ते आणि मुख्याधिकाऱ्यांमध्ये काही काळ वाद–ावादी झाली. खासदार राजू शेट्टी यांच्या वीस लाख रुपयांच्या स्थानिक विकास निधीतून शहरातील प्रियदर्शनी कॉलनी ते हेरवाडे कॉलनी येथील अंतर्गत रस्ता, शाहूननगर वॉर्ड क्रमांक २१ मधील अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, शाहूनगरमधील गटार बांधकाम करणे; तसेच शिवशक्ती कॉलनीमधील बगीच्याभोवती कंपौंड बांधण्याची वीस लाख रुपयांची कामे नियोजित आहेत. मात्र, पालिकेकडून यासाठी देखभाल व दुरुस्तीचे हमीपत्र मिळत नसल्याने याआधीही स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी मुख्याधिकाऱ्यांनी घेराओ घालून हमीपत्राची मागणी केली होती. हमीपत्राचा विषय नगराध्यक्षांच्या अधिकारात असल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी लेखी दिल्यानंतर या आंदोलनावर पडदा होता.

सकाळी अकरा वाजता पुन्हा 'स्वाभिमानी' कार्यकर्त्यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या

पान ७ वर ▶

चौपदरीकरणाच्या आंदोलनात आता 'स्वाभिमानी'ची उडी

थेट सहभाग : शिवसेनेपाठोपाठ रस्त्यावर येण्याची तयारी सुरू

राजू शेट्टी

जयसिंगपूर: कोल्हापूर-सांगली महामार्ग चौपदरीकरणाच्या आंदोलनात शिवसेनेपाठोपाठ आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही उडी घेतली आहे. लाचखोर अधिकाऱ्यांना 'लाचलुचपत'च्या जाळ्यात अडकविणारे तसेच खताच्या लिंकिंगला खतपाणी घालणाऱ्या अधिकाऱ्यांचा समाचार घेणारे 'स्वाभिमानी'चे कार्यकर्ते खासदार राजू शेट्टींच्या नेतृत्वाखाली आता चौपदरीकरणासाठी रस्त्यावर येणार आहेत.

केवळ ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संघटना म्हणजे स्वाभिमानी शेतकरी संघटना, असे चित्र मध्यंतरीच्या काळात तयार झाले होते; मात्र गेल्या दोन वर्षांपासून संघटनेने अन्य प्रश्नांमध्येही लक्ष घालून ही प्रतिमा काही प्रमाणात सुधारली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग असो किंवा महावितरणचे अधिकारी; वरकमाईच्या मागणीबद्दल त्यांना अद्दल घडविण्यात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आहे. खताचे लिंकिंग करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही चोप देण्यात कार्यकर्ते मागे नाहीत. मात्र, कोल्हापूर-सांगली महामार्ग चौपदरीकरणात केवळ शिवसेनेने सर्वप्रथम आवाज उठवून शासन दरबारी या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. शिवसेनेने निर्णायक आंदोलनाला सुरवात केली आहे.

'स्वाभिमानी'चे जिल्हा उपाध्यक्ष उल्हास पाटील, सावकर मादनाईक, सुभाष शेट्टी आदींनी या आंदोलनासाठी तयारी सुरू केली आहे. लवकरच रास्ता रोकोसारखी आंदोलने केली जाणार आहेत. खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन केले जाणार आहे. याप्रश्नी सर्वच पक्ष व संघटनांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावण्याची गरज असून, शिवसेनेच्या आंदोलनाबरोबर आता 'स्वाभिमानी' रस्त्यावर येत असून, खासदार शेट्टी शासनावर दबाव टाकण्यात कितपत यशस्वी होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

नेत्यांनो, एक व्हा!

कोल्हापूर-सांगली महामार्गावरील वाहतूक असुरक्षित बनून दिवसेंदिवस बळींची संख्या वाढत असताना शासन पातळीवर मात्र या प्रश्नाचे भिजत घोंगडे कायम आहे. याप्रश्नी 'स्वाभिमानी'ही आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. त्यामुळे आता सर्वच पक्ष व नेत्यांनी एकत्रितपणे यासाठी लढा देण्याची गरज आहे.

दुसरा साखर कारखाना २५ कि.मी.च्या आत नको

नव्या १०० कारखान्यांचे भवितव्य अंधारात

मुंबई : राज्यात यापुढे २५ किलोमीटरच्या आत नव्या साखर कारखान्याला परवानगी नाकारण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असून त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यावर शिक्कामोर्तब झाले. शासनाच्या या निर्णयामुळे नव्या परवानगीच्या प्रतीक्षेत असलेल्या १०० कारखान्यांचे भवितव्य टांगणीला लागले असून या निर्णयावर उद्योगमंत्री नारायण राणे व सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनी प्रस्तावाला विरोध केल्याचे समजते.

राज्यात सध्या १६३ सहकारी व ४२ खासगी साखर कारखाने आहेत. केंद्र सरकारच्या धोरणानुसार दोन कारखान्यांमधील जास्तीत जास्त १५ कि.मी.चे अंतर निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच १५ कि.मी.च्या त्रिज्येत दुसरा कारखाना उभारण्यास परवानगी देण्यात येत नाही. नव्याने प्राप्त झालेल्या १०० कारखान्यांना परवानगी दिल्यास साखर कारखान्यांची संख्या ३००च्या वर जाण्याची भीती शासनाने व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या कारखान्यांच्या गाळपक्षमतेचा पुरेपूर वापर होणार नाही आणि उभारणी झालेले सर्व कारखाने आर्थिकदृष्टया अडचणीत येतील, तसेच ऊसतोडणी मजुरांची घटत असलेली संख्या, उपलब्ध उसाचे क्षेत्रफ ळ व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिला जाणारा हमी भाव यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता शासनाने वर्तविली आहे. ९ फे ब्रुवारी २०११ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हाच प्रस्ताव आणला असता नारायण राणे, हसन मुश्रीफ व अन्य मंत्र्यांनी कडाडून विरोध केल्याने प्रस्ताव बारगळला होता. त्यानंतर आजच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

सध्या अस्तित्वात असलेल्या कारखानदारांनीच नवे कारखाने येऊ नयेत म्हणून प्रस्ताव आणल्याची टीका फे ब्रुवारीच्या मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आली होती. त्याचीच पुनरावृत्ती आजच्या बैठकीत झाल्याचे सांगण्यात येते. उसाला पाण्याची जास्त गरज आहे. सध्या उपलब्ध उसालाच पाणी पुरवणे जिकिरीचे झाले आहे. असे असताना नवे कारखाने उभारल्यास आणखी उसाची गरज भासेल व त्यासाठी पाणी कुठून आणणार, असा सवाल जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांनी केला. यावर हा प्रस्ताव शेतकऱ्यांच्या हिताचा आहे की कारखानदारांच्या हिताचा, अशा शब्दांत उद्योगमंत्री नारायण राणे व सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केल्याचे समजते.

चक्का जाम

सांगली–कोल्हापूर रस्ता चौपदरीकरण व्हावे यासाठी स्वाभिमानी संघटनेच्यावतीने अंकली पुलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

उसावर साखर सम्राटांचा काटामारीने दरोडा

वशी येथील कार्यक्रमात राजू शेट्टी यांची टीका

शिराळा: आनचा कारखाना रिकव्हरीत दोन नंबर म्हणणारे, शेतकऱ्यांना ऊस दर देताना पहिल्या पंधरा नंबरमध्ये दिसत नाहीत. हे लोक मोठ्या प्रमाणावर काटामारी करून शेतकऱ्यांच्या उसावर दरोडा घालत आहेत. अशी घणाघाती टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केली.

ते वशी ता. वाळवा जि. सांगली येथे ९४ लाख खर्चाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या भूमिपूजन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार शिवाजीराव नाईक होते. स्वागत सरपंच जयश्री पाटील यांनी केले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत, युवानेते सत्यजित नाईक, सी. एच. पाटील, ग्लुकोजचे उपाध्यक्ष अशोकराव पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील उपस्थित होते.

खासदार शेट्टी पुढे म्हणाले, साखर कारखानदार शेतकऱ्यांची पिळवणूक करून गर्भश्रीमंत झाले आहेत. त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. साखर सम्राटांनी काटामारी करून हडप केलेली रक्कम अब्जावधी रूपयांची

आहे. त्यांना आपण हार, तुरे, फेटे देतो, त्यांच्या नावांच्या घोषणा देतो ही मोठी शोकांतिका आहे.

शिवाजीराव नाईक म्हणाले, शेतकऱ्यांची उसाबाबत होणारी पिळवणूक लक्षात घेऊन शिवाजी केन प्रोसेसर्स या नवीन प्रकल्पाची स्थापना केली जात आहे. या प्रकल्पात आत व बाहेर जाणाऱ्या वाहनांसाठी एकच काटा असणार आहे. या कारखाण्याबाबत अनेक अफवा पसरवल्या, मात्र शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर शेअर्सची खरेदी करून त्यांना उत्तर दिले आहे. आम्ही पारदर्शक कारभार या प्रकल्पातून करणार आहोत.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत, जयसिंगराव शिंदे आदींची भाषणे झाली. कार्यक्रमास शहाजी पाटील, युवराज यादव, उल्हास पाटील, सतीश पाटील, माणिक पाटील, शामराव पाटील, प्रकाश गायकवाड, बी. टी. पाटील, होसेराव मेथे, नागनाथ पाटील, बी. टी. पाटील, गणपतराव देशमुख, विलासराव देशपांडे, कांदेकर आप्पा, झेल बापू कोंडीबा अनुसे उपस्थित होते. आभार सतीश पाटील यांनी मानले.

खासगी शिक्षकांचे जयसिंगपुरात उपोषण

जयसिंगपूर(प्रतिनिधी): शासकीय सेवेत असताना तसेच शाळा आणि महाविद्यालयामध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असतानाही खासगी शिकवण्याचा सपाटा सुरू केला आहे. त्यांच्यावर त्वरीत कारवाई करावी, म्हणून शिरोळ खासगी क्लासेस संघटनेच्यावतीने येथील क्रांती चौकात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. शासनाने अशा शिक्षकांवर त्वरीत कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उपोषणावेळी देण्याच आला.

शासनाच्या नियमानुसार शाळा महाविद्यालयामध्ये सेवेत असताना खासगी क्लासेस घेण्यास बंदी असताना शिरोळ तालुक्यात ३० पेक्षा अधिक शिक्षक खासगी क्लासेस घेतात. काही शिक्षक आपल्याच क्लासला यावा यासाठी त्या संबंधित विद्यार्थ्यांवर दबाव आणतात. तसेच क्लासला न आल्यास कमी मार्क देईन अशी धमकीही देतात. अशा शिक्षकांवरती शासनाने कडक कारवाई करावी, यासाठी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे यांनी आपले मार्गदर्शन केले. यावेळी सावकर मादनाईक, पंचायत समिती सदस्या सौ. प्रमिला पाटील, सुभाष शेट्टी, शैलेश आडके, सागर मादनाईक, योगेश चौगुले यांनी भेट देऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आंदोलनास पाठिंबा व्यक्त केला.

आ. सा. रे. पाटील, आ. सुजित मिणेचकर, राजेंद्र पाटील – यड्रावकर, नगराध्यक्षा सौ. अनिता कोळेकर, उपनगराध्यक्ष कल्यानसिंग रजपूत, आदींसह विविध मान्यवरांनी यावेळी भेटी दिल्या.

दौलत कारखान्याविरोधात 'स्वाभिमानी उच्च न्यायालयात

कोल्हापूर (प्रतिनिधी) : ९ फेब्रुवारी ते हंगामअखेर गाळप झालेल्या उसाचे पैसे विक्री केलेल्या साखरेतून इतरांची देणी व देता शेतकऱ्यांना प्राधान्याने देण्यासाठी सिव्हील ऑप्लिकेशन मुंबई उच्च दाखल करण्याचा ठराव स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या बैठकीत करण्यात आला.

दरम्यान, विले भिआली नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे दौलतच्या संचालकांच्या घरासमोर करण्यात येणारा संखध्वनी रद्द करण्यात आला. बिलासंदर्भात कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांच्या घरासमोर संखध्वनी आंदोलन करण्यात येणार होते. पण सभेला कारखान्याचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक तसेच तासगावकर शुगर्सचे प्रतिनिधी हजर राहण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन रद्द करून कारखाना साईटवरील गणेश मंगिरात सभा घेण्याचे ठरले. मोजक्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत शेतकरी आक्रमक बोलत होते. काही शेतकऱ्यांनी स्वत:ची मालमत्ता तारण ठेवून कारखाना चालवावा, अशी भूमिका मांडली.

प्रारंभी संघटनेच्या कृष्णराव रेंगडे यांनी तासगाव शुगरर्सचे एन. डी. मोहिते यांना थारेवर धरत त्वरीत बिले देण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांच्या मार्फत उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

समडोळीचा बाल जलतरणपटू संस्कार

जयसिंगपूर: कोण म्हणते लहान वयात मुलींना आपल्या करीअरची समज नसते? वयाच्या दुसऱ्या वर्षापासून आपल्याला कोण बनायचे हे निश्चित करून समडोळी येथील चार वर्षाचा जलतरणपटू संस्कार आज डोळ्याची पापणी लवते न लवते तोच वारणेचे पात्र लिलया पोहून पार करतोय. त्याचे हे कसब निश्चितच कौतुकास्पद आहे.

संस्कार संजय सुतार .... मुर्ती लहान, पण किर्ती महान, असेच काहीसे त्याच्याबाबतीत म्हणावेसे लागेल. समडोळीसारख्या छोट्या गावात, घरी पारंपारिक सुतारकाम व शेती हाच पालकांचा उद्योग. वयाच्या दुसऱ्या वर्षी कधीतरी सहज म्हणून संस्कारला वारणेच्या पात्रात सोडला. पण अल्पावधीतच संस्कारने पोहण्याची कला एवढी आत्मसात केली की, वारणेचे पात्र तो लिलया पार करू लागला. मुलाचे हे कौशल्य पाहून त्याचे वडील संजय यांनाही हुरूप आलाय. त्याला हवे ते मार्गदर्शन करण्यासाठी संजय सतत धडपडत असतात. अगदी गेल्या वर्षी जुलैमध्ये पुरात दुधडी भरून वाहणारी नदी त्याने लिलया पार केली.

वयाच्या दुसऱ्या वर्षी पोहायला शिकलेल्या संस्कारने गेल्या दोन वर्षात पट्टीचा जलतरणपटू म्हणून त्याने पश्चिम महाराष्ट्रात नाव कमावले आहे. आपल्या घराण्याचे नाव मोठे करणार असे तो नेहमी सांगत असतो. झी २४ तास, स्टार माझा, साम मराठी, ई टी. व्ही या मराठी वाहिन्यांनीही संस्कारच्या कौशल्याचे आपल्या कार्यक्रमाव्दारे सादरीकरण करून त्याच्या कर्तृत्वाची झालर उंचावण्याचा प्रयत्न केला. खासदार राजू शेट्टी यांनीही त्याचे कौशल्य पाहून कौतुक केले. त्याला या क्षेत्रातील शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याचे खासदार राजू शेट्टी व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केले आहे. जलतरण संस्था व शासनाने त्याला सहकार्य करण्याची गरज आहे. कमीत कमी वेळेमध्ये जास्तीजास्त अंतर पोहून गिनीज बुक ल लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळवायचा संस्कारचा संकल्प आहे.

आष्ट्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग होणार

आष्टा : आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी गटाच्या विरोधात आव्हान उभे करण्याच्या दृष्टीने शहरात मोट बांधण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. स्वाभिमानी परिवर्तन विकास आघाडीच्या रूपाने तिसऱ्या आघाडीचा पर्याय उभा केला जात आहे. काटा लढतीसाठी सक्षम उमेदवाराची चाचपणी सुरू आहे.

शहरात नगरपालिका निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले आहे. नोव्हेंबर-डिसेंबर २०११ मध्ये पालिकेची निवडणूक होत आहे. २००६ ची निवडणूक बिनविरोध झाली होती. पालिकेत ग्रामविकास मंत्री जयंत पाटील व माजी आमदार विलासराव शिंदे यांच्या गटाची सत्ता आहे. विकासकाम ', विश्वासात घेतले जात नसल्याच्या कारणावरून दोन्ही गटांत अनेकदा जुंपली आहे. निकृष्ट कामे, भ्रष्टाचार या बाबत चौकशीची मागणी या गटांतर्गत झाली आहे. याला आष्टेकर जनता आहे. मात्र, 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असा कारभार सुरू आहे. शहरात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य आहे. शहराच्या राजकीय पटलावर माजी आमदार विलासराव शिंदे, ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांचे गट प्रबळ आहे. पालिका निवडणुकीत हे गटच एकमेकांचे तुल्यबळ कट्टर विरोधक आहेत. सत्ता बदलाची क्षमता या दोन्ही गटांत आहे.

आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर दोन्ही गटांकडून मशागत सुरू होती. मात्र, जयंत पाटील यांनी संघर्ष टाळत विलासराव शिंदे यांच्या आदेशानुसार पालिका निवडणूक बिनविरोध होईल, असे संकेत दिल्याने दोन्ही गटांचे मनोमीलनाचे प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही गटांतील काहींनी लढण्याची तयारी दर्शवली आहे. अनेक मातब्बरांनी सावध पवित्रा घेतला आहे. वाईटपणा नको यासाठी काही जण दुरुनच निशाणा साधण्याचे प्रयत्न करीत आहेत. अनेकांचे बिनविरोधच्या वेगावर स्वार होण्याचे मनसुबे आहेत. असे असले तरी गत पंचवार्षिक निवडणुकीचा अनुभव विच- ारात घेता आगामी निवडणूक सत्ताधाऱ्यांना सरळ, सोपी ठरेल असे सध्या चित्र नाही. पायाभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरलेले सत्ताधारी जनतेचा असंतोष यावर स्वार होत सत्ताधाऱ्यांना चारीमुंड्या चीत करण्याच्या दृष्टीने शहरातील अनेक शक्ती एकवटत आहेत.

कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. सत्ताधाऱ्यांना आव्हान देण्याच्या व्यूहरचना, कार्यकर्ता बांधणी सुरू आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, हुतात्मा संकुलाचे वैभव नायकवडी, माजी मंत्री मदन पाटील, वसंतदादा कारखान्याचे अध्यक्ष विशाल पाटील, नानासाहेब महाडिक यांचे समर्थक एकवटत आहेत. त्यांनी पालिका निवडणुकीसाठी कंबर कसल्याची चर्चा आहे. कार्यकर्त्यांच्या बैठका, चर्चा सुरू आहेत. स्वाभिमानी परिवर्तन विकास आघाडीच्या रूपाने तिसऱ्या आघाडीचा पर्याय उदयास येत आहे. तिला तिसऱ्या फ ळीतील तरुणांची साथ मिळत आहे. सत्ताधारी गटातील नाराजांची साथ मि ळाल्यास ही आघाडी पालिका निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना खडतर आव्हान ठरेल.

कर्जमाफी योजनेचा तपशील कॅगने मागविला

नवी दिल्ली(वृत्तसंस्था): केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या ७१ हजार कोटी रूपयांच्या कृषी कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा तपशील सादर करा, असा आदेश कॅगने विभागीय ग्रामीण बँका, सहकारी बँकांसह सर्वच बँकांना दिला आहे.

माहीतीगार सुत्रांनी सांगितले की, शेतकऱ्यांना सवलत म्हणून जाहीर झालेल्या या योजनेची किती प्रभावीपणे अंमलबाजवणी झाली. याचा आढावा घेण्यात येत असून, त्यासाठीच ही माहिती बॅकांकडून मागविण्यात आली आहे. या योजनेचा ४ कोटी शेतकऱ्यांना फायदा झाल्याचा दावा सरकारने केला होता. त्यानंतरच वस्तुस्थिती समजावून घेण्यासाठी कॅगने हालचाली सुरू केल्या आहेत. कॅगने आपला अहवाल तयार केल्यानंतर तो संसदेच्या पटलावर मांडला जाईल. साधारणपणे बॅकांच्या खात्याची माहिती कॅग घेत नाही. हे काम रिझर्व्ह बँक करते. त्यामुळेच कॅगचे हे पाऊल अभूतपूर्व मानले जाते. २००८ साली सरकारने साडेतीन कोटी शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली होती. तसेच एक कोटी शेतकऱ्यांनीही अंशतः सवलत देणारी स्वतंत्र योजना जाहीर केली होती. या योजनेतहत पाच एकरपर्यंत जमीन असणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांना छोट्या अवधींचे कर्जमाफ करण्यात आले होते. ही योजना ३० दिवसांच्या मर्यादित अवधीसाठीच होती. ती ३० जून २००८ रोजी समाप्त झाली होती. दुसऱ्या योजनेत पाच एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कर्जाची काही रक्कम भरल्यानंतर एकरकमी पैसे भरण्याची अट रद्द करण्यात आली होती.

साखर कारखान्यांना अखेर बसणार अडीच हजार कोटींचा दणका

आयकर मुक्तीबाबत केंद्राकडून वाटाण्याच्या अक्षता

मुंबई : राज्यातील सर्व साखर कारखाने आयकरमुक्त करावेत, अशी मागणी पंतप्रधान, अर्थमंत्री यांच्याकडे अथकपणे करूनही केंद्र सरकारने केवळ वाटाण्याच्या अक्षता दाखविल्याने अखेर अडीच हजार कोटींची रक्कम कारखान्यांच्या मानगुटीवर बसली आहे. त्यामुळे राज्यातील सर्व कारखाने अडचणीत आले आहेत. पैसा द्यायचा कुठून, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नगर जिल्ह्यातील नेवासा येथील संत ज्ञानेश्वर साखर कारखान्याबाबत ३० टक्के कर लावण्याचा आयकर खात्याने घेतलेला निर्णय राज्यातील १३४ सहकारी आणि ४२ खासगी कारखान्यांना लागू होणार आहे. त्यामुळे किमान २५०० कोटी रुपये आयकर भरावा लागणार आहे. या संदर्भात मार्ग काढण्यासाठी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या विनंतीवरून सर्वप्रथम १९ जानेवारीला केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विलासराव देशमुख, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे अध्यक्ष नितीन गडकरी, गोपीनाथ मुंडे आदी सर्वपक्षीय नेते मंडळींनी प्रथम पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांची भेट घेतली.

केवळ आश्वासनांचे गाजर

सरकारने कारखान्यांकडे प्रायव्हेट कंपनी म्हणून न पाहता शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून पाहावे, अशी विनंती शिष्टमंडळाने केली होती. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर टॅक्स असोसिएशनकडे या प्रश्नी अपील करावे, अशी सूचना प्रणव मुखर्जी यांनी केली. तीही अखेर फसवणूकच ठरली.

सकारात्मक निर्णय घेतो, असे सांगत पंतप्रधान डॉ. सिंग यांनी बोळवणच केली. सकारात्मकतेचे काय झाले, हे अद्यापपर्यंत कळलेच नाही. पंतप्रधानांच्या आश्वासनाला सहा महिने झाले. केंद्राने राज्य सरकारची मागणी शीतगृहात टाकल्याचे स्पष्ट झाले आहे. पुन्हा एकदा केंद्र सरकार महाराष्ट्रासमवेत भेदभाव करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आयकर कार्यालयाच्या म्हणण्यानुसार, शेतकऱ्यांना पहिला हप्ता देण्यात येतो, तो उसाचा दर असतो. तर, दुसरा-तिसरा आणि अंतिम हप्ता हा कारखान्याचा नफा आहे. त्यामुळे तो कर उत्पन्न आहे, म्हणून सर्व साखर कारखानदारांनी ३० टक्के आयकर भरणे गरजेचे आहे; मात्र असा कर लावला तर सहकारी साखर कारखानदारी उद्ध्वस्त होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. अगोदरच बहुतेक कारखान्यांवर कर्जाचा डोंगर आहे. एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज अशी अवस्था आहे. कामगारांचे वेतन आणि शेतकऱ्यांची बिले पडली आहेत. अनेक आजारी कारखान्यांचे लिलाव होत आहेत. त्यामुळे कारखानदारी चालविणे फार कठीण झाले आहे.